# प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळा
## मानव विकास व कौटूंबिक अभ्यास विभाग
## सामुदायिक विज्ञान महाविद्यालय, वनामकृवि, परभणी

Inward No. — Outward No. 05
Date : 05.04.23
College of Community Science
VNMKV, Parbhani

जा.क्र.एलपीपीएस/सिसिएस/05/23
दि. 05.04.2023

### शैक्षणिक वर्ष २०२३-२४ प्रवेशासंबंधी परिपत्रक

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत असणाऱ्या सामुदायिक विज्ञान महाविद्यालयातील मानव विकास व कौटुंबिक अभ्यास विभागात असणाऱ्या प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेची सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया सुरू झालेली असून, या प्रवेश प्रक्रियेत प्ले सेक्शन (२ ते ३ वर्षे वयागट) व बड्स सेक्शन_(३ ते ४ वर्षे वयागट) विद्यार्थ्यांसाठी प्रवेश अर्ज विक्री दि.५ ते २७ एप्रिल २०२३ दरम्यान सुरु राहाणार असून प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेच्या कार्यालयात सकाळी ९.३० ते १.०० व दुपारी २.३० ते ४.३० या वेळेत प्रवेश अर्ज विक्री चालू राहील तथा ते स्विकारण्यात येतील. दि. २७ एप्रिल २०२३ रोजी मात्र अर्ज स्वीकारण्याची वेळ सकाळी ९.३० ते १.०० व दुपारी २.३० ते ३.३० याप्रमाणे असेल. प्रवेश अर्ज सादर केल्यानंतर अर्जासोबत जोडण्यात आलेल्या कागदपत्रात कोणत्याही प्रकारचा फेरफार करता येणार नाही. अपूर्ण सादर केलेले अर्ज प्रवेश प्रक्रियेमध्ये बाद ठरविण्यात येतील.

- या प्रवेश प्रक्रियेत मागील वर्षी सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेतील प्रवेशित विद्यार्थ्यांना त्यांच्या संबंधीत कक्षात प्रवेश घेण्याकरिता प्रथम प्राधान्य देण्यात येऊन तद्नंतर राहिलेल्या रिक्त जागा नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना खुल्या करण्यात येतील.
- प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेच्या निर्धारित नियमाप्रमाणे केवळ विकासात्मक कमतरता असणाऱ्या विद्यार्थ्यांव्यतिरिक्त इतर कक्षात नव्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया लॉटरी पद्धतीने वयाच्या चढत्या क्रमानुसार निश्चित करण्यात आलेली आहे.प्ले सेक्शनच्या एकूण निर्धारित जागा पैकी ५० टक्के जागा या वनामकृवि कर्मचारी वर्गाच्या बालकांकरिता (त्यापैकी पुरूष कर्मचारी वर्गासाठी ५० टक्के जागा व स्त्री कर्मचारी वर्गासाठी ५० टक्के जागा असतील.) तर उर्वरित ५० टक्के जागा या वनामकृवि कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त असलेल्या कुटुंबियांसाठी राखून ठेवल्या आहेत. असे करत असतांना उपरोक्त उल्लेखित दोन प्रवर्गाच्या(वनामकृवि कर्मचारी व या कर्मचाऱ्या व्यतिरिक्त असणारे कुटूंबिय) प्रत्येकी ५० टक्के जागासाठी प्रवेश देतांना त्याचे उपप्रवर्ग करण्यात येऊन प्रत्येक प्रवर्गातील ५० टक्के जागा या मुलांसाठी व ५० टक्के जागा या मुलींसाठी राखीव असतील. प्रवेशाच्या वेळी एखाद्या प्रवर्गातील जागा रिक्त राहिल्यास उपलब्ध प्रवर्गातून शाळेच्या नियमाने त्या जागा भरण्यात येतील.
- वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या उपरोक्त राखीव जागांव्यतिरिक्त या विद्यापीठातील सामुदायिक विज्ञान महाविद्यालयाच्या शैक्षणिक/संशोधन क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी त्यांच्या गरजेनुसार कोणत्याही कक्षात दोन जागा राखीव असतील.

- वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी कर्मचारी प्रवर्गातून प्रवेश अर्ज सादर करावयाचे असल्यास अर्जासोबत कर्मचाऱ्याने स्वतःच्या कार्यालया प्रमुखांतर्फे संबंधीत कर्मचारी त्यांच्या कार्यालयात सध्या कार्यरत असल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
- प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेत सौम्य पातळीवरील विकासात्मक दृष्ट्या कमतरता असलेल्या (Developmentally Subnormal)६-८ विद्यार्थ्यांना प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेत प्रवेश देण्यात येऊन त्यांच्या क्षमतांप्रमाणे त्यांचे प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेच्या इतर कक्षात विलिनीकरण (Integration) करण्यात येईल. असे करत असतांना सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात विकासात्मक दृष्ट्या कमतरता असलेल्या ज्या विद्यार्थ्यांनी या शाळेत प्रवेश घेतला होता त्यातील सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्राधान्याने प्रवेश देण्यात येणार असून तद्नंतर राहिलेल्या रिक्त जागा या नव्याने भरण्यात येतील. असे नवीन होणारे प्रवेश हे प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर आधारित देण्यात येणार असून त्यांच्या प्रवेशाकरिता कोणत्याही प्रवर्गासाठी जागा राखीव ठेवलेल्या नसल्याने या उर्वरित जागांसाठी प्रवेश खुला असेल. नवीन प्रवेशासाठी विकासात्मक दृष्ट्या कमतरता असलेल्या बालकांचे या विभागातील बाल मार्गदर्शन व कौटुंबिक समुपदेशन चिकित्सालयात मुल्यमापन केल्यानंतर बालकांच्या बुद्धयांक व स्वास्थ्याच्या स्थितीआधारे त बालकाची प्रवेशासाठीची वैधता ठरविण्यात येईल.
- प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेतील दुपारच्या सत्रात असणाऱ्या सीसीएसएफ सेक्शनचा (Child Care Support to Family) प्रमुख उद्देश हा केवळ बालकांची काळजी व त्यांच्या विकासासाठी मनोरंजनात्मक कार्य घेणे हा आहे. या सेक्शनमध्ये उपलब्ध असलेल्या जागा या गरजू विद्यार्थ्यांना जसे की ज्यांचे दोन्ही पालक नोकरी/ व्यवसाय / शिक्षण अशा कार्यात व्यस्त असतील अथवा पालकांच्या आजारांमुळे बालकांची काळजी घेण्यात त्यांना समस्या उद्भवत असतील. एक पालक असणारे बालक (Single Parent ) असेल अशा किंवा इतरही तत्सम सबळ कारणास्तव गरजू पालकांच्या पाल्यासाठी असून या सेक्शनमधील रिक्त जागा प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेच्या निर्धारीत नियमाप्रमाणे भरण्यात येतील. तेव्हा या कक्षात उपरोक्त पार्श्र्वभूमीवर पाल्यास प्रवेश द्यावयाचा असल्यास त्यासंबंधीचा पुरावा दर्शवणारी कागदपत्रे प्रवेश अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. या सेक्शनमध्ये सन २०२३ -२४ या नवीन शैक्षणिक वर्षात सकाळच्या सत्रात प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यासाठी १० जागा राखून ठेवलेल्या आहेत. या कक्षातील उर्वरीत जागा शाळेच्या नियमाप्रमाणे भरण्यात येतील तसेच हा कक्ष देखील जेव्हा प्रा.पू.प्रा.शाळा प्रत्यक्षात सुरु होईल तेव्हाच सुरु करण्यात येईल.
- **सन २०२३-२४ मध्ये प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेच्या सकाळच्या सत्रातील प्ले सेक्शन (वयोगट २ ते ३ वर्षे) व बड्स सेक्शन (३ ते ४ वर्षे वयोगट) वगळता इतर कक्षातील (फ्लॉवर्स व ब्रिज सेक्शन) ज्या जागा पुर्वीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यानंतर रिक्त राहतील त्याबाबतची माहिती दि.१७ एप्रिल २०२३ रोजी जाहिर करण्यात येणार असून त्यासाठी दि.१७ ते २७ एप्रिल २०२३ या कालावधीत शाळेच्या कार्यालयीन दिवशी सकाळी ९.३० ते १.०० व दुपारी २.३० ते ४.३० यावेळेत या सेक्शनसाठी नविन प्रवेश अर्ज स्विकारण्यात येतील.**
- **दि.२७ एप्रिल २०२३ रोजी सायंकाळी ४.०० वाजता सामुदायिक विज्ञान महाविद्यालय कार्यालयात प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेच्या प्रवेश समितीतर्फे सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात सर्व सेक्शन्समध्ये नव्याने प्रवेशित होणा-या विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी वय निश्चीत करण्याकरिता लॉटरी काढण्यात येणार आहे.**

तेव्हा इच्छूक पालकांनी त्यांच्या पाल्यांच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे व इतर बाबीविषयी काटेकोरपणे जाणून घेऊन प्रवेशाच्या सर्व तयारीनिशी प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेत संपर्क साधावा.

- **प्रवेशासंबंधी विशेष सूचना**

विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज सादर करण्यापुर्वी त्यासोबत खालील बाबी असणे आवश्यक आहेत.

१. जन्म प्रमाणपत्रः नगर परिषद/महानगरपालिका/जिल्हा रुग्णालय/ग्रामपंचायतद्वारे पारीत

२. बालकाचे नुकतेच काढलेले २ पासपोर्ट आकाराचे फोटो

३. प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेच्या ज्या सेक्शनसाठी बालकाचे वय योग्य असेल त्या कक्षात त्यास प्रवेश देण्यात येईल. यासाठी ३१ मे २०२३ पर्यंत बालकांचे वय ग्राहय धरण्यात येईल. बालकास अशाप्रकारे प्रवेश देत असतांनाच त्यांच्या विकासात्मक क्षमताही विचारात घेऊन याबाबत प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळा समितीचा निर्णय अंतीम राहील.

४. प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेची निर्धारीत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करुन बालकास या शाळेत प्रवेश मिळाल्यानंतर, बालकांच्या सामान्य विकासाबाबत अथवा शाळेतील वातावरणात समायोजित होण्याबाबत शाळा प्रशासनास काही गैर बाब आढळल्यास त्याची शहानिशा करुन अशा विद्यार्थ्यांचा प्रवेश रदद करण्यात येईल.

५. प्रवेश प्रक्रियेच्या नियोजित वेळापत्रिकेत काही अपरिहार्य कारणास्तव बदल करावयाचा झाल्यास, हे अधिकार प्रवेश समितीने राखून ठेवले आहेत.

## सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेचा नियोजित कार्यक्रम

- कार्यदिनः सोमवार ते शुक्रवार असा पाच दिवसाचा आठवडा असेल (प्रत्येक शनिवारी व रविवार) शाळेस सुट्टी असेल तसेच सर्व शासकीय व विद्यापीठातर्फे जाहीर सुट्ट्यांच्या दिवशी शाळा बंद असेल
- प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या शनिवारी पालकांना त्यांच्या पाल्यासंबंधी जाणून घेण्यासाठी शिक्षकांशी संपर्क करता येईल.
- प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेचा गणवेश अनिवार्य आहे.
- **प्रथम सत्रः** दि. १२ जुन ते ९ नोव्हेंबर २०२३ ( दिपावली सुट्टीः दि.१० नोव्हेंबर ते १९ नोव्हेंबर २०२३)
- श्री महालक्ष्मी सणानिमित्त दि.२१ ते २४ सप्टेंबर २०२३ या कालावधीत प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेस सूट्टी असेल.
- **द्वितीय सत्रः**दि.२० नोव्हेंबर २०२३ ते २९ मार्च २०२४

### प्ले सेक्शन, बड्स विद्यार्थ्यांच्या प्रवेशासंबंधीचे वेळापत्रक

| | |
|---|---|
| नवीन प्रवेश अर्ज स्वीकारण्याचा कालावधी | दि ५ ते २७ एप्रिल २०२३ |
| नवीन प्रवेश अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांची प्रथम यादी प्रदर्शित करुन शुल्क स्वीकारण्याचा कालावधी | दि २ ते ०९ मे २०२३ |
| नवीन प्रवेश अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांची व्दितीय यादी प्रदर्शित करुन शुल्क स्वीकारण्याचा कालावधी | दि १० ते १२ मे २०२३ |

### फ्लॉवर्स व ब्रिज सेक्शनच्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशासंबंधीचे वेळापत्रक

| | |
|---|---|
| नवीन प्रवेश अर्ज स्वीकारण्याचा कालावधी | दि १७ ते २७ एप्रिल २०२३ |
| नवीन प्रवेश अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांची प्रथम यादी प्रदर्शित करुन शुल्क स्वीकारण्याचा कालावधी | दि ०२ ते ०९ मे २०२३ |
| नवीन प्रवेश अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांची व्दितीय यादी प्रदर्शित करुन शुल्क स्वीकारण्याचा कालावधी | दि १० ते १२ मे २०२३ |

**प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांच्या प्रवेश अर्जासोबत आवश्यक असणाऱ्या बाबी**

- **विशेष सुचना : प्रवेश अर्जासोबत खालील कोणत्याही कागदपत्रांच्या मुळप्रती स्वीकारण्यात येणार नसून त्याच्या साक्षांकित झेरॉक्स प्रती जोडणे अनिवार्य आहे.**

- जन्म प्रमाणपत्रः नगर परिषद/महानगरपालिका/जिल्हा रुग्णालय/ग्रामपंचायतद्वारे पारीत
- बालकाचे नुकतेच काढलेले २ पासपोर्ट आकाराचे फोटो
- वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी कर्मचारी प्रवर्गातून प्रवेश अर्ज सादर करावयाचा असल्यास अर्जासोबत कर्मचाऱ्याने स्वतःच्या कार्यालया प्रमुखांतर्फे संबंधीत कर्मचारी त्यांच्या कार्यालयात सध्या कार्यरत असल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
- विकासात्मक कमतरता असलेल्या बालकांना (Developmentally Subnormal) प्रवेश दयावयाचा असल्यास उपरोक्त बाबीबरोबरच बालकांचा या महाविद्यालयाच्या मानव विकास व कौटुंबिक समुपदेशन चिकित्सालयाचा मूल्यमापन अहवाल
- दुपारच्या सत्रातील सीसीएसएफ सेक्शनमध्ये (Child Care Support to Family) विद्यार्थ्यास प्रवेश दयावयाचा असल्यास उपरोक्त बाबी बरोबरच त्याचे/ तीचे दोन्ही पालक नोकरी/व्यवसाय/शिक्षण अशा कार्यात व्यस्त आहेत अथवा पालकांच्या आजारामुळे बालकांची काळजी घेण्यात त्यांना समस्या उद्भवत आहेत, एक पालक असणारे बालक (Single Parent) आहे अथवा अशी इतर सबळ कारणे असल्याचा पुरावा दर्शवणारी कागदपत्रे.
- प्रा.पू.प्रा.शाळेत विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाल्यानंतर त्यांना व त्यांच्या पालकांना या शाळेच्या निर्धारित नियमांचे पालन करावे लागेल.
- प्रा.पू.प्रा.शाळेचे विहीत शपथपत्र विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्या वेळी पालकांना सादर करावे लागेल.

सहयोगी प्राध्यापक
प्रा.पू.प्रा.शा. समन्वयिका (वित्त)
सा.वि.म. वनामकृवि,परभणी

विभाग प्रमुख
प्रा.पू.प्रा.शा. प्रमुख समन्वयिका
सा.वि.म. वनामकृवि,परभणी

सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य
सामुदायिक विज्ञान महाविद्यालय
वनामकृवि,परभणी

# प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळा

## सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील प्रस्तावित सेक्शन्स व शैक्षणिक शुल्क/सत्र

| अ. क्र. | प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळा सेक्शन | वयोगट | निर्धारीत जागा | सत्रनिहाय शुल्क (रुपये) | | वार्षिक एकूण शुल्क (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | प्रथम सत्र शुल्क (रु.) | द्वितीय सत्र शुल्क (रु.) | |
| १ | प्ले सेक्शन (१००% अनौपचारीक शिक्षण) | २ ते ३ वर्षे | ३० (प्रत्येकी १५ विद्यार्थ्यांचे दोन गट) | १०,०००+२०० (शैक्षणिक शुल्क+नोंदणी शुल्क) | १०,००० | २०,२०० |
| २ | बड्‌स सेक्शन (अ) | ३ ते ४ वर्षे | ३० | १०,०००+२०० (शैक्षणिक शुल्क+नोंदणी शुल्क) | १०,००० | २०,२०० |
| ३ | बड्‌स सेक्शन (ब) | ३ ते ४ वर्षे | ३० | १०,०००+२०० (शैक्षणिक शुल्क+नोंदणी शुल्क) | १०,००० | २०,२०० |
| ४ | फ्लॉवर्स सेक्शन (अ) | ४ ते ५ वर्षे | ३० | ११,०००+२०० (शैक्षणिक शुल्क+नोंदणी शुल्क) | ११,००० | २२,२०० |
| ५ | फ्लॉवर्स सेक्शन (ब) | ५ ते ६ वर्षे | ३० | ११,०००+२०० (शैक्षणिक शुल्क+नोंदणी शुल्क) | ११,००० | २२,२०० |
| ६ | ब्रिज सेक्शन | ५ ते ६ वर्षे | ३० | ११,०००+२०० (शैक्षणिक शुल्क+नोंदणी शुल्क) | ११,००० | २२,२०० |
| ७ | डिएससी (विकासात्मक दृष्ट्या कमतरता असणारे विद्यार्थी) | वयोगट ३ ते १० वर्षे | ६-८ | १०,०००+२०० (शैक्षणिक शुल्क+नोंदणी शुल्क) | १०,००० | २०,२०० |
| ८ | सीसीएसएफ सेक्शन (Child Care Support to Family) (विकासात्मक कार्ये, आहार व विश्रांती) | २ ते ८ वर्षे | २० | १०,००० | १०,००० | २०,००० |

- **सन २०२३-२४ या शैक्षिणिक वर्षातील प्रथम सत्रास प्रवेश घेण्यासाठी शाळा प्रशासनाने प्रस्तावित केलेले शुल्क कार्यालयात जमा करावे.**